| MHKO170001862014 | **नियमित दिवाणी दावा ४८/२०१४**<br>**श्री. भिमराव बाजीराव करवते वगैरे**<br>**वि.**<br>**शेवंता रामचंद्र कांबळे** |
|---|---|

## नि ८४ वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादी यांनी भूमि अभिलेख यांचे मार्फत दावा मिळकतीची मोजणी होणेकरीता दाखल केलेला आहे.

२. सदर कामी प्रतिवादी यांनी मोजणी बाबत त्यांना कोणतीही हरकत नसलेचे कथन केले आहे.

३. वादी यांच्या अर्जाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता वादी यांनी सदरचा दावा नोंदणीकृत खरेदीपत्रावरुन खरेदीपत्र पूर्ण होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. सदर कामी वादी व प्रतिवादी यांनी दावा मिळकतीची खाजगी मोजणी करुन घेतलेली आहे. सदर खाजगी मोजणीमध्ये दावा मिळकतीचे क्षेत्र प्रत्यक्ष जागेवर कमी भरत असलेचे वादी व प्रतिवादी यांच्या निदर्शनास आल्याचे त्यांनी कथन केले आहे.

४. एकंदरीतच सदर कामी वादी यांचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे असे वाटते. सबब मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१. वादी यांचा नि ८४ वरील अर्ज मंजूर करणेत आला आहे.**

**२. तालुका निरीक्षक भुमि अभिलेख पन्हाळा यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करणेत येत आहे.**

**३. न्यायालयीन आयुक्त यांची शासकीय मोजणी फी वादी यांनी भुमिअभिलेख**

कार्यालयात आदेश तारखेपासून पुढील ३० दिवसांच्या आत भरावी.

४. न्यायालयीन आयुक्त यांनी मौजे इंजोळे, ता. पन्हाळा या गावचे ग्रामपंचायत हद्दीतील भुमापन गट क्र. ११ याचे मोजमाप करून, मोजमाप व नकाशा यांचेसहीतचा अहवाल न्यायालयात न्यायालयीन आयुक्त शासकीय मजणी शुल्क वादी यांनी भुमि अभिलेख कार्यालयात भरल्यापासून पुढील ६० दिवसांच्या आत न्यायालयात तात्काळ सादर करावा.

४. वादी व प्रतिवादी यांनी सदरबाबत न्यायालयीन आयुक्त यांना सहकार्य करावे.

५. येणेप्रमाणे कमीशन पत्र पाठविण्यात यावे.

सही/-

दि. २४/०४/२०२६.

**( के. दि. काकतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पन्हाळा